# « SUR LES PAS DE L'INDE » - « THE STEP TO INDIA »

INDIAN PRESS MAHARASHTRA (NASIK)

## फ्रेंच कलाकारांचा नृत्याविष्कार 'पाऊले चालती भारताची वाट'



नाशिकच्या शिवालय नृत्यकला मंदिर आणि भारत-फ्रान्स सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारत-फ्रान्स नृत्योत्सवात फ्रान्सचे पॅट्रिक व निर्मला ग्लेझ यांनी भारत-फ्रान्स नृत्योत्सवाचे बारावे पुष्प गुंफले. सुरुवातीला कालीमातेची स्तुती सादर करून अलारिपु हा शुध्द नृत्यातील प्रकार सादर केला.

पॅट्रिक यांनी रुद्रशिवावतार व शिवलिंग प्रार्थना नृत्याद्वारे सादर केली. भारदस्त शरीरयष्टीच्या या फ्रेंच कलाकाराने तांडवशैली उत्कृष्टतेने सादर केली.

ग्लेझ दांम्पत्याच्या गुरुंनी कै.मुथ्थुस्वामींनी शिकवलेली कला त्यांनी 'भज गोविंदम' या खास फ्रेंच भाषेतील रचनेवर भरतनाट्यम् करून भारत-फ्रान्स या दोन देशातील सांस्कृतिक मैत्री समर्थपणे मांडली.

कार्यक्रमाच्या समारोपाला आनंदतांडवम हे नृत्य सादर करून त्यांनी शिवपार्वतीचा नृत्यमय सवालजवाब सादर केला. जागतिक मराठी दिनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम 'पाऊले चालती भारताची वाट' या शीर्षकाखाली फ्रेंच कलाकारांनी सादर करून त्यांचे भारतीय संस्कृती व अध्यात्मावरील प्रेम प्रगट केले. सुरुवातीला प्रमुख पाहुणे जिल्हा व सत्र न्यायाधीश भडंग व सौ.भडंग, तसेच उपन्यायाधीश सौ.जवळकर, ॲड. बालाजीवाले यांच्या हस्ते नटराजपूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. बालाजी मंदिरात आयोजित या कार्यक्रमास संस्थापक-अध्यक्ष प्रा.दीपक मगरे, महासचिव माधव गाडगीळ, फ्रान्स व जर्मनीचे तसेच नाशिककर नृत्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "ON THE WAY TO INDIA"

**Mrs. and Mr. Patrick Gleyse from Marseilles performed Indian classical dance during the 12th Session of Indo-French dance festival in Nasik, organized by Shivalaya Nrityakalamandir and Indo-French Cultural Association. Patrick's body is very strong and he performed very vigourous Shiva and Nirmala responded as Parvati to him. They have represented the dance art tought by the late Muthuswamy Pillai specially Bhaje Govindam. This was the real representation between the Indian and French Art. Ananda tandava: Nice, the audience remembered the divine couple Shiva-Parvati in the form of the French couple. By this program, they have expressed their love about india and spirituality. The chief guest was the civil judge and his assistant and the venue was also wonderfull (Balaji temple) and showed their "Goût" for the Indian culture.**

*GANVAKARI* *Maharashtra newspaper*